# **रे.दि.मु.क्र.१९/२०२२ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश**

०१. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने असे कथन केले आहे की, मौजे महंमदपुर, ता. बाभुळगाव येथील सर्व्हे क्र. २१/१, क्षेत्र १ हे. २० आर. ही मिळकत मुळची चंद्रभागाबाई पांडुरंग कामडी यांच्या मालकीची होती. चंद्रभागाबाई ही वादीचे वडील श्रावण यांची आई सुन वादी हा चंद्रभागाबाई यांचा नातु आहे. चंद्रभागाबाई यांना एक मुलगा व दोन मुली आहेत. त्यापैकी प्रतिवादी ही चंद्रभागाबाई हिची एक मुलगी आहे. वादीचे आजोबा पांडुरंग हे सन २००७–२००८ मध्ये मयत झाले. त्यानंतर चंद्रभागाबाई ही वादी व त्याचे वडील श्रावण यांच्यासोबत देवळी येथे राहु लागली. चंद्रभागाबाई ही काही दिवस वेणी (कोठा) येथे वडीलोपार्जीत घरमिळकतीत देखील राहत होती. त्यानंतर चंद्रभागाबाई हिने दिनांक २४/१२/२००९ रोजी दोन साक्षीदारांसमक्ष वादीच्या हक्कात नोंदणीकृत मृत्युपत्र केले. त्यानंतर चंद्रभागाबाई ही मौजा वेणी येथे घरामध्ये तिच्या मुलीसह राहु लागली. त्यावेळी वादी व वादीचे वडील चंद्रभागाबाई यांना ब–याचवेळा भेट देण्यासाठी जात होते व तिची काळजी घेत होते.

०२. वादीने पुढे असे कथन केले आहे की, गेले चार ते पाच वर्षापासुन चंद्रभागाबाई ही आंधळी व बहिरी झाली होती. गेल्या दिड वर्षापासुन ती अंथरुणावर खिळून होती. ती दिनांक २४/१२/२०२१ रोजी मयत झाली. त्यानंतर वादीला प्रतिवादीने चंद्रभागाबाईपासून काही कागदपत्रे करुन घेतल्याचे माहीत झाले. त्यानंतर वादीने फेरफार नोंदीच्या नकलेला अर्ज दिला. सदर नक्कल मिळाल्यानंतर व ती वाचल्यानंतर वादीला असे समजले की, प्रतिवादीने मयत चंद्रभागाबाई हिची फसवणुक

करुन दिनांक ३१/१२/२०२० रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्र तिच्या नावे करुन घेतले आहे. मयत चंद्रभागाबाई अंथरुणावर खिळून असल्याने व तिची मानसिक अवस्था चांगली नसल्याने ती काय करीत होती हे तिला समजत नव्हते. तशा स्थितीत तिने प्रतिवादीला बक्षीसपत्र करुन दिले आहे. प्रतिवादीने मयत चंद्रभागाबाई वर दबाव टाकुन सदर बक्षीसपत्र करुन घेतले आहे. त्यामुळे ते वादीवर बंधनकारक नाही.

०३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीच्या उता–यावर प्रतिवादीच्या नावाची नोंद झाली आहे. त्याचा फायदा घेवुन प्रतिवादी ही वादीला दावा मिळकतीतुन बेदखल करण्याचा वारंवार प्रयत्न करीत आहे. तसेच ती दावा मिळकत ति–हाईत इसमाला हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीला बक्षीसपत्र रद्द करण्याबाबत कायदेशिर नोटीस पाठविली. मात्र सदर नोटीस मिळुनही प्रतिवादीने बक्षीसपत्र रद्द केले नाही व वादीला खोट्या आशयाची उत्तरी नोटीस पाठविली. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादीविरुध्द तिने वादीच्या दावामिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अथडळा करुन नये तसेच तिने दावा मिळकत ति–हाईत इसमास हस्तांतरीत करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश होवुन मिळण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादीने निशाणी १५ कडे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादीने म्हणण्यामध्ये असे कथन केले की, वादीने दाव्यामध्ये नमुद केलेल्या नातेसंबंधाबाबत वाद नाही. मात्र वादी व वादीचे वडील मयत चंद्रभागाबाई यांचा सांभाळ करीत असून, तिची काळजी घेत होते व आवश्यक गरजा पुरवित होते हे खोटे आहे. मयत चंद्रभागाबाई ने वादीच्या हक्कात नोंदणीकृत केलेले मृत्युपत्र खोटे

आहे. मयत चंद्रभागाबाई ही तिच्या स्वतःच्या घरात मौजा वेणी (कोठा) येथे राहत होती. प्रतिवादीचा पती साधारण १० वर्षापुर्वी मयत झाला. त्यानंतर प्रतिवादी तिच्या मुलीसह मौजा वेणी येथे तिची आई चंद्रभागाबाई कडे राहण्यास गेली. तेव्हापासून प्रतिवादीने चंद्रभागाबाई हिची सर्वप्रकारे काळजी घेतली व पालनपोषण केले. चंद्रभागाबाई ने स्वतः विकत घेतलेल्या दावा मिळकतीची वहिती करुन प्रतिवादी व मयत चंद्रभागाबाई हे उदरनिर्वाह करीत होते. चंद्रभागाबाई ही वादी अथवा त्यांच्या वडीलांकडे कधीही राहत नव्हती. त्यामुळे चंद्रभागाबाई ने वादीस मृत्युपत्र करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. चंद्रभागाबाई ने तिची शारिरीक व मानसिक स्थिती चांगली असतांना व प्रतिवादी बद्दल असलेल्या नैसर्गिक प्रेमापोटी कोणाच्याही दबावाखाली न येता प्रतिवादीच्या हक्कात दावा मिळकतीचे बक्षीसपत्र करुन दिलेले आहे. त्याप्रमाणे दावा मिळकतीचे महसुल अभिलेखावर प्रतिवादीचे नाव नोंद झाले आहे. प्रतिवादी ही गेल्या कित्तेक वर्षापासून दावा मिळकतीत वहिती करीत आहे. मात्र वादीचा दावा मिळकतीत कधीही ताबा नव्हता. दावा मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने वादीने खोटा दावा व प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादपत्र निशाणी क्र. १ वर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज निकाली करण्यासाठी विचाराधीन उपस्थित झालेले वादप्रश्न आणि त्यावरील माझे सकारण निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. वादीने तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | ... | नाही. |
| ०२. न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | ... | नाही. |
| ०३. तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... | नाही. |
| ०४. आदेश कोणता ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३–**

०६. मुद्दे क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत.

०७. वादी व प्रतिवादी यांच्यामधील नातेसंबंध निर्विवाद आहेत. तसेच वादीचे आजोबा पांडुरंग हे सन २००७–२००८ मध्ये मयत झाले, चंद्रभागाबाई ही दिनांक २४/१२/२०२१ रोजी मयत झाली या बाबी उभय पक्षकारांमध्ये निर्विवाद आहेत.

०८. वादीच्या कथनानुसार मयत चंद्रभागाबाई ने त्याच्या हक्कात दावा मिळकतीचे नोंदणीकृत मृत्युपत्र केले असून दावा मिळकत त्याच्या कब्ज्यात आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार ती बक्षीसपत्राने दावा मिळकतीची मालक झाली असून गेल्या कित्तेक वर्षापासून दावा मिळकत तिच्या कब्जे वहिवाटीत आहे.

०९. वादीने निशाणी ३/१ कडे दिनांक ३१/१२/२०२० रोजीचे बक्षीसपत्राची छायांकित प्रत, निशाणी ३/२ कडे दिनांक २४/१२/२००९ रोजीच्या

मृत्युपत्राची छायांकित प्रत, निशाणी ३/३ कडे दावा मिळकतीचा सन २०१६–१७ ते सन २०१८–१९ मधील सातबारा उतारा, निशाणी ३/५ कडे दावा मिळकतीचा सन २०१९–२० ते सन २०२१–२२ मधील सातबारा उतारा दाखल केला आहे. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, दिनांक २४/१२/२००९ रोजी चंद्रभागाबाई हिने दावा मिळकतीबाबत वादीच्या हक्कात मृत्युपत्र केलेले आहे. तसेच दिनांक ३१/१२/२०२२ रोजीचे बक्षीसपत्रा अन्वये दावा मिळकतीच्या सातबारा उता–यावर प्रतिवादीच्या नावाची नोंद झालेली आहे. त्यापुर्वी दावा मिळकत ही मयत चंद्रभागाबाई हिच्या नावे नोंद होती.

१०. वादीने दावा मिळकत त्याच्या ताब्यात आहे या कथनाच्या पृष्ट्यर्थ निशाणी १८/१ कडे साक्षीदार संजय देवगीर गिरी याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर साक्षीदाराने शपथपत्रामध्ये असे कथन केले आहे की तो लोणी येथील रहिवासी असून वेणी हे गाव त्याच्या गावास लागुन आहे. तो लोणी व वेणी शिवारातील शेतक–यांची शेतजमिन मक्त्याने करतो. गेल्या तिन ते चार वर्षापर्यंत तो वादी व त्याचे वडील यांची सर्व्हे क्र. २१/१ ही मौजा वेणी येथील शेतजमिन मक्त्याने करीत होता. त्याचा मक्ता रक्कम रुपये १८०००/– वादीने त्याला दिला होता. मागील तिन वर्षापासून त्याने दावा मिळकत वादीच्या वहितीत व ताब्यात असल्याचे पाहीले आहे.

११. यावरुन वादीच्या विद्वान विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वादीच्या कब्जे वहिवाटीत असल्यामुळे वादी यांनी प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. प्रतिवादी ही वादीच्या दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अथडळा करीत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

१२. याउलट प्रतिवादीच्या विद्वान विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, मृत्युपत्राने वादी दावा मिळकतीचा मालक झाला आहे. तथाकथित बक्षिसपत्र बेकायदेशीर आहे. प्रतिवादी ही बक्षीसपत्राने दावा मिळकतीची मालक व कब्जेदार झाली आहे. दावा मिळकत प्रतिवादीच्या कब्जात आहे. वादीचा दावा मिळकतीत कब्जा नाही. मयत चंद्रभागाबाई ने प्रतिवादीच्या हक्कात नोंदणीकृत बक्षीसपत्र करुन दिल्याने तथाकथीत मृत्युपत्र हे आपोआप रद्द झाले आहे. त्यामुळे वादीचा दावा मिळकती कोणताही हक्क उरलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१३. प्रतिवादीने तिच्या कथनाच्या पृष्ट्यर्थ निशाणी १४/३ कडे मनोहर दरणे व निशाणी १४/४ कडे बाबाराव डंभारे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यांनी शपथपत्रामध्ये असे कथन केले आहे की, मौजा वेणी कोठा येथील गट क्र. २१/१ मध्ये त्यांच्या मालकीची व ताब्याची जमिन आहे. त्याच गट क्रमांकामध्ये प्रतिवादी पंचफुला हिचे शेत आहे. सदर शेत मयत चंद्रभागाबाई ने मनोहर याच्याकडून विकत घेतले आहे. गेल्या दहा वर्षापासून सदर शेत प्रतिवादी पंचफुला हिच्या ताब्यात असून ती सदर शेताची वहिती करीत आहे. सदर शेत वादीच्या कधीही ताब्यात व वहितीत नव्हते व नाही.

१४. तसेच प्रतिवादीने तिच्या कथनाच्या पृष्ट्यर्थ निशाणी २४/३ व २४/४ कडे दावा मिळकतीत पेरणी केल्याबाबतची बियाणे खरेदी पावती व ट्रॅक्टर भाड्याची पावती दाखल केली आहे.

१५. वादी हा देवळी, ता. देवळी, जि. वर्धा येथे राहतो ही बाब निर्वीवाद आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी ही वेणी (कोठा), ता. बाभुळगाव येथे राहते ही बाब देखील

निर्वीवाद आहे. दावा मिळकत ही मौजे वेणी (कोठा) येथे आहे. दावा मिळकत ही मयत चंद्रभागाबाई हिची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची मिळकत होती याबाबत उभय पक्षकारांमध्ये वाद नाहीत. चंद्रभागाबाई दिनांक २४/१२/२०२१ रोजी मयत झाली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी ही मयत चंद्रभागाबाई सोबत राहत होती ही बाब देखील वादीने वादपत्रात नमुद केली आहे. अशा परिस्थितीत प्रथमदर्शनी दावा मिळकत ही मयत चंद्रभागाबाई व प्रतिवादी यांच्या कब्जे वहिवाटीत होती असे दिसून येते. प्रतिवादीची दावा मिळकत तिच्या ताब्यात होती व आहे या कथनास दावा मिळकतीचा सातबारा उतारा प्रथमदर्शनी पुष्टी देतो. दावा मिळकतीच्या सातबारा उता–यावर प्रतिवादीचे नाव नोंद झालेले आहे.

१६. वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे कथनाच्या पुष्ट्यर्थ साक्षीदारांची शपथपत्रे दाखल केली आहेत. मात्र प्रतिवादीने ज्या साक्षीदारांचे शपथपत्रे दाखल केली आहेत ते साक्षीदार हे दावा मिळकतीचा गट क्र. २१/१ मधील भोगवटदार आहेत. वादीने दाखल केलेल्या शपथपत्रातील साक्षीदार हा मौजा लोणी येथे राहतो. त्याचा दावा मिळकतीशी प्रत्यक्ष संबंध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीने दाखल केलेल्या शपथपत्रातील साक्षीदारांची कथने प्रथमदर्शनी विश्वासार्ह वाटतात.

१७. प्रतिवादीतर्फे दाखल बियाणे खरेदी पावती व ट्रक्टर भाडेपावती देखील दावा मिळकत प्रतिवादीच्या कब्जात व वहितीत असल्याचे प्रथमदर्शनी दर्शवितात. याउलट केवळ नोंदणीकृत मृत्युपत्राआधारे वादीचा दावा मिळकतीत कब्जा आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येणार नाही. त्याचप्रमाणे वादीने दावा मिळकतीत त्याचा कब्जा आहे हे प्रथमदर्शनी सिध्द करणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर

दाखल केलेला नाही. केवळ वादीच्या व साक्षीदार संजय गिरी याच्या शपथपत्रातील कथनावरुन दावा मिळकतीत वादीचा ताबा आहे हे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. याउलट दाखल कागदपत्रे दावा मिळकतीत प्रतिवादीचा कब्जा असल्याचे प्रथमदर्शनी दर्शवितात.

१८. वादीचे असे देखील कथन आहे की, प्रतिवादी ही दावा मिळकत हस्तांतरीत करु शकते. तसे झाल्यास वादीचे नुकसान होणार आहे. मात्र प्रतिवादीने दावा मिळकत कोणत्या तारखेस, कशा प्रकारे व कोणास हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न केला याबाबत वादीने प्रस्तुत अर्जामध्ये कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी ही दावा मिळकत हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येणार नाही. अशा परिस्थितीत कोणतेही कारण घडलेले नसताना प्रतिवादी विरुध्द तिने दावा मिळकतीचे हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करता येणार नाही.

१९. वादी हा मृत्युपत्राने दावा मिळकतीचा मालक झाला आहे अथवा नाही, प्रतिवादीच्या हक्कात केलेले बक्षिसपत्र बेकायदेशीर आहे अथवा नाही या बाबींचा दाव्याची चौकशी होवुन गुणदोषावर निर्णय होणार आहे. दाव्याच्या या टप्पयावर त्याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही.

२०. अशा परिस्थितीत वर नमुद चर्चेनुसार दावा मिळकत वादीच्या कब्जे वहिवाटीत आहे हे प्रथमदर्शनी सिध्द करण्यास वादी अपयशी ठरला आहे असे मी समजतो. त्यामुळे वादी सकृतदर्शनी केस त्याच्या बाजुने आहे हे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. पर्यायाने न्यायाचा समतोल

वादीच्या बाजुने नाही हे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे नुकसान होईल असे दिसून येते. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नाही असे नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ४ –**

२१. वरीलप्रमाणे सर्व चर्चा लक्षात घेता मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज निशाणी ५ खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2022.07.12 17:46:23 +0530

बाभुळगाव. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक– १२/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बाभुळगाव.